I J R S S I S, Spl Issue (IV), March-2022 : 406-409
A Double-Blind Peer Reviewed Journal
OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article
Reg. No. : MH-NGP/0000167
INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES
© VMS RESEARCH FOUNDATIONwww.ijrssis.in

# महिला सक्षमीकरणात स्वयंसहाय्यता समूहाची भूमिका

प्रा.पुरूषोत्तम सुरेश उरकुडे

एम.ए. समाजशास्त्र (बि.एड)
डॉ.खत्री महाविद्यालय तुकूम चंद्रपूर

Communicated :20.02.2022 | Revision : 15.03.2022 Accepted :25.03.2022 | Published: 01.04.2022

**संदर्भ :**

प्रस्तुत विषयाच्या अनुषंगाने महिला सक्षमीकरणामध्ये स्वंयसहाय्यता समुहाची भूमिका कशा प्रकारची आहे याविषयी चर्चा करण्यात आली आहे. समाज विकासाचा महत्वाचा घटक म्हणून आज स्त्रियांकडे बघितले जाते त्यामुळे त्यांच्या कार्यामध्ये आणि विकासामध्ये स्वंयसहाय्यता समुहाची भुमिका ही अत्यंत महत्वाची असल्याचे दिसून येते. महिला विकासामध्ये ज्या योजना आहेत. त्या योजनांची कार्ये आणि विकासकामे याविषयीची माहिती यातून मिळण्यास मदत होताना दिसून येईल. तसेच बचत गटाच्या माध्यमातून महिलांच्या आर्थीक सक्षमीकरणास चालना मिळताना दिसून येईल.

**बिजशब्द** — बचत गट दुग्ध व्यवसाय सॅनिटरी नॅपकिन महिलांचे सबलीकरण.

**प्रस्तावना:**

समाजामध्ये महिलांना मानसन्मान प्रतिष्ठा मिळवून देण्यासाठी तसेच त्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने शासनाने महिलांना अर्थिकदृष्टया स्वावलंबी बनवण्यासाठी महाराष्ट्रामध्ये महिला स्वयंसहाय्यता बचत गट, सावित्रीबाई फुले बहुउद्देशीय महिला केंद्र, कामधेनू योजना, देवदासी प्रतिबंधक कायदा इत्यादी महिलांच्या सबलीकरणाचे अनेक उपक्रम राज्याने राबविले आहेत. त्यामध्ये सर्वात महत्वाची गोष्ट म्हणजे महिला स्वयंसहाय्यत बचत गट समाजामध्ये ही एक मोठी संस्था नावारूपास आली आहे. त्यामुळे महिलांचे समाजातील स्थान उंचावण्यास मदत होते.

भारताच्या लोकसंख्येचा आढावा घेतला असता ५० टक्के महिलांची संख्या आहे. परंतु पुरूषाप्रमाणे त्यांचे स्थान दिसत नाही. २० वे शतक महिलांच्या उन्नतीसाठी महत्वाचे ठरले आहे. राष्ट्रीय संयुक्त राष्ट्रसंघाचे (U.N.O.) १९७५ हे वर्ष महिला वर्ष म्हणून तर १९७५ ते १९८५ हे महिला दशक म्हणून पाडण्यात आले आहे. याच काळात महिला सबलीकरण या संकल्पनेत मोठया प्रमाणावर चालन मिळाली आहे. बचत गटाची प्रथम सुरूवात बांगलादेशमध्ये मोहम्मद युनुस यांनी केली. त्यांना त्यांच्या कार्याबद्दल २००६ साली शांततेचा नोबेल पुरस्कार प्रदान करण्यात आला. भारतामध्ये इला भट्ट या महिलेने भारतात १९७७ साली ग्रामीण बॅंकेची सुरूवात केली होती. त्यांच्या कार्याबद्दल त्यांना भारत सरकारने पद्यभूषण पुरस्कार देऊन गौरविले त्यांनी अनेक महिलांच्या चळवळी उभ्या केल्या. त्यामुळे मोहम्मद युनुस यांच्याप्रमाणे इला भट्ट यांचेही नाव बचत गट चळवळीशी जोडले गेले आहे.

स्त्रीत्वाचा सन्मानार्थ संपूर्ण जगभरात ८ मार्च हा दिवस जागतिक महिला दिन म्हणून साजरा केला जातो. याचा मुख्य उद्देश महिलांप्रती जिव्हाळा, आदर, करण्याबरोबरच त्यांचे आर्थिक सामाजिक व राजकीय क्षेत्रात केलेली उल्लेखनीय कामगिरीला प्रोत्साहन देणे होय. स्त्री या समाजाचा आधार स्तंभ असून त्यांचे संरक्षण व जपणूक करण्याची जबाबदारी ही समाजाची आहे. निरोगी व सुसंस्कृत समाज निर्माण करण्यासाठी महिलांचे योगदान महत्वाचे आहे.

बचत गट मोठया प्रमाणात ग्रामीण भागामध्ये दिसून येतात महिलांमध्ये सामाजिक आर्थिक व राजकीय बदल घडवून आणण्यासाठी बचत गटाचा उपयोग किती प्रमाणात होत आहे. याचा अभ्यास प्रस्तुत शोधनिबंधात दाखविण्याचा प्रयत्न केलेला आहे.

**महिला सक्षमीकणाची संकल्पना :**

महिलांचे सक्षमीकरण म्हणजे स्त्री सक्षमीकरण आणि स्त्री सक्षमीकरणाचा अर्थ असा की, स्त्रीने स्वत:च्या क्षमतांचा विकास करायचा व स्वत:वर परिणाम करणाऱ्या घरगुती व सामाजिक निर्णयांच्या प्रक्रियेत सहभागी होण्याचा प्रयत्न करायचा व जीवनाच्या सर्व क्षेत्रात तिला प्राप्त होऊ शकणाऱ्या सर्व शक्तीची ओळख करून घेण्याचा प्रयत्न होय.

**स्वयंसहायता समूह (बचत गटाची) संकल्पना :—**

''ज्यात प्रामुख्याने समान प्रश्न सारखे आचार विचार समाज मत आणि परस्पर जवळीक असणारे लोक स्त्री किंवा पुरूष येतात व बचतीच्या माध्यमातून आपल्या छोटया मोठया आर्थिक गरजा भागवून आपला सर्वांगीण विकास करतात व त्यास बचत गट म्हणतात.''

महिला स्वयंसहायकता समूहाची (गटांची) स्थिती :–

गटाच्या नावाने बचत खाते उघडून आधी बचत नंतर कर्ज या तत्वाने गटास कर्ज उपलब्ध होते. एकूण स्वयंसहायता गटामध्ये महिला स्वयंसहायता गटाची स्थिती दर्शविणारी सारणी पुढील प्रमाणे.

भारतातील स्वयंसहायता गटाची बचतीच्या माध्यमातून बॅकेची जोडणी होऊन बॅकेच्या व्यवहार कक्षेत आलेल्या गटांची संख्या ६१.२१ लाख आहे. या गटांच्या बचत खात्यावर ५५४५.६२ कोटी रूपये रक्कम जमा झालेली आहे या एकुणात महिला गटांचे प्रमाण ७९.५ टक्के आहे. तसेच बचतीच्या आधारावर आणि सामुदायिक दायीत्वाच्या आधारावर संपूर्ण भारतात ४२.२४ लाख स्वयंसहाय्यता गटांना २२६७९.८४ कोटी रूपयांचे सूक्ष्म कर्ज उपलब्ध झालेले आहे. या एकुणात महिला स्वयंसहायता गटाचे प्रमाण ७७.६० टक्के आहे. त्यामुळे बचत व कर्ज या सुक्ष्म वित्त व्यवहार यांच्या माध्यमातून वर्षानुवर्षे दुर्लक्षित असलेल्या महिला बॅक व्यवहाराच्या मुख्य प्रवाहात सामील झालेल्या आहेत. ही स्थिती महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणास देशाच्या विकासाच्या दृष्टीने आश्वासक आहे.

**महिलांच्या सामाजिक स्थितीत सुधरणा:–**

स्वयंसहायता समुहाच्या माध्यमातून महिलांच्या सामाजिक स्थितीत मोठया प्रमाणावर सुधारणा झाल्याचे दिसून येते. कारण आजच्या घडीला महिला अधिक सक्षम झाल्या आहे. अनेक गावातील महिला बचत गटाच्या माध्यमातून निरनिराळे उद्योग स्थापन करून त्याद्वारे औद्योगिक क्षेत्रात देखील सक्षम होण्याचा प्रयत्न करत असल्याचे दिसून येते. याआधी फक्त चूल आणि मुल एवढयापुरत्या मर्यादीत असलेल्या महिला क्षेत्रात बचत गटाच्या माध्यमातून पुढे येत आहे. ज्या महिलांनी कधी बॅक बघितली नव्हती अशा महिला देखील आज प्रत्यक्ष बॅकेत जाऊन व्यवहार करू लागल्या आहे. त्यामुळे त्यांच्या जीवनात देखील मोठया प्रमाणात सुधारणा होत असल्याचे निदर्शनस येते. ज्या महिलांना प्रत्येक वेळेस आर्थिक चणचण भासायची आज त्याच महिला बचत गटाच्या माध्यमातून पैशाची बचत करून आर्थिक सक्षम होत आहे. आणि त्यामुळे मोठया प्रमाणावर महिलांच्या राहणीमानात व जीवनात बदल होऊन सुधारणा होत असल्याचे आढळून येते. आणि म्हणूनच आजच्या घडीला पुरूषांप्रमाणे महिलांना देखील समाजात मानाचे स्थान देण्यात येत आहे.

**महिलांची उद्योग क्षेत्रात प्रगती :–**

स्वयंसहायता समूहाच्या माध्यमातून अनेक स्त्रिया या उद्योगाकडे वळताना दिसून येत आहे. वेगवेगळया प्रकारचे लघुउद्योग महिला कमी पैशात घरच्या घरी करण्याचा प्रयत्न करीत आहे. काही महिला या वैयक्तिकरित्या बचत गटामार्फत कर्ज काढून व्यवसाय करीत आहे. तर काही महिला सामूहिकरीत्या बचत गटाच्या माध्यमातून एखादी उद्योग स्थापन करून त्या बचतगटामार्फत चालवत आहेत.

स्त्रिया एकत्र येऊन व्यवसाय करीत असल्यामुळे आणि ही परदर्शकता सहकार्याची प्रक्रिया असल्यामुळे स्त्रियांमध्ये मोठया प्रमाणात उद्योजकता निर्माण झाली आहे. त्यामुळे अनेक प्रकारचे सूक्ष्म, उद्योग, लघु उद्योग, तसेच काही मोठे उद्योग देखील या बचत गटाच्या माध्यमातून उभे झाल्याचे निदर्शनास येते. त्यापैकी काही उद्योग खालीलप्रमाणे:–

**सामूहिक दुग्ध व्यवसाय :–**

अनेक महिलांनी स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातून कर्ज काढून दुग्धव्यवसाय यासारखे व्यवसाय सुरू केलेले आहेत. बचत गटाच्या माध्यमातून त्यांनी अनेक देशी विदेशी गाई व म्हशी घेऊन व्यवसाय सुरू केला आहे त्याचे उदाहरण द्यायचे झाल्यास नांदेड शहरापासून ५ किलोमीटरवर खडकत गाव आहे तेथील गावकऱ्यांचा मुख्य व्यवसाय शेती तसेच पशुपालन आहे हे गाव शहराजवळ असल्याकारणाने दुग्ध व्यवसायही चांगल्या प्रकारे कार्यरत आहेत.

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या (मविम) रमाई लोकसंचालित साधन केंद्र, अर्धापूर अंतर्गत खडकुत येथे १९९४ पासून महिला बचत गट कार्यरत आहेत. महाराष्ट्र ग्रामीण पतपुरवठा प्रकल्प अंतर्गत (MRCP) गावात १६ महिला बचत गटांची नोंदणी झाली त्यामध्ये २१६ महिला सहभागी आहेत. या १६ बचत गटांनी मिळून सुजाता ग्राम संस्था स्थापन केली आणि त्यांचे बॅकेत खाते आहे यातील प्रत्येक सदस्य महिलेने बचत गटा अंतर्गत कर्ज आणि बॅकेतर्फे कर्ज घेऊन प्रत्येकी दोन म्हशी खरेदी केल्या आहे. त्यामुळे पारंपारिक दूध व्यवसायाला बळकटी मिळाली.

**सॅनिटरी नॅपकिन उद्योग:–**

महिलांसाठी अतिशय आवश्यक असणारी गोष्ट म्हणजे सॅनेटरी नॅपकिन आज बाजारात अनेक मोठया मोठया कंपन्यांची सॅनिटरी नॅपकिन्स उपलब्ध आहे. परंतु ते सामान्य व गरीब स्त्रियांना परवडणारे नसल्याने काही (NGO) च्या माध्यमातून बचत गटाच्या स्त्रियांना प्रशिक्षण देऊन सॅनिटरी नॅपकिन चा उद्योग सुरू करण्यास प्रोत्साहित करीत आहे. आणि हे नॅपकिन बाजारातील नॅपकिन पेक्षा काही प्रमाणात वाजवी दरात या स्त्रिया स्वत:च गरजू स्त्रियांपर्यंत पोहोचवत आहेत. असाच एक उद्योग सांगायचा झाल्यास सोलापूर जिल्हयातील अक्कलकोट जवळच्या

जेऊन येथील श्री जीवनज्योती महिला विकास बचट गट हा सॅनिटरी नॅपकिन बनविणारा महाराष्ट्रातल पहिला बचत गट असून आज महाराष्ट्रात २५ जिल्हयात सॅनिटरी नॅपकिन निर्मितीचे युनिटस स्थापन झाले आहेत. शिवाय भारतातील अनेक राज्यात महिला स्वयंसहाय्यत समुह मार्फत ठीकठिकाणी सॅनिटरी नॅपकिन्स बनवणारे युनिटस आकार घेत आहेत.

**निष्कर्ष :**

बचत गटाच्या माध्यमातून भारतीय स्त्री ही अधिक सक्षम झाल्याचे दिसून येते. कारण बचत गटामुळे प्रत्येक स्त्रीला एखदा व्यवसाय करायचा असल्यास किंवा कौटुंबिक आर्थिक गरज भासल्यास तिला वेळेवर कर्जाच्या स्वरूपात पैसा मिळत आहे. आणि म्हणूनच आजच्या घडीला महिला औद्योगिक आणि व्यावसायिक क्षेत्राकडे अधिक वळलेल्या दिसून येते इतकेच नाही तर व्यावसायिक क्षेत्राकडे अधिक वळलेल्या दिसून येते इतकेच नाही तर व्यावसायिक दृष्टया महिला स्वयंपूर्ण झालेल्या दिसून येत आहे. बचत गटामुळे विधवा महिलांना मोठा आधार झालेला आहे. अशा महिलांना कौटुंबिक आधार नसतानादेखील या महिला बचत गटाच्या माध्यमातून अनेक क्षेत्रात कार्य करीत आहेत. व त्यांना बचत गटामार्फत प्रशिक्षणाची सुविधा देखील केल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील महिला असो की शहरी भागातील महिला त्यांना बचत गटाच्य माध्यमातून अधिक सक्षम करण्याचे कार्य सध्या सुरू आहेत. त्यामुळे महिला सक्षमीकरण मोठया प्रमाणावर होताना दिसत आहे. एकूणच असे निदर्शनास आले की महिलांवर स्वयंसहायता समूहाचा प्रभाव मोठया प्रमाणावर पडल्याचे दिसत आहे. स्वयंसहायता समूहात सामील झाल्यामुळे महिलांच्या आर्थिक स्थितीत बदल झाल्याचे दिसून येते. आणि त्यामुळे महिलांचे सबलीकरण हे आर्थिकतेत असल्यामुळे महिलांना आर्थिकदृष्टया स्वावलंबी बनवून महिलांचे समाजातील स्थान पक्के करण्यासाठी महिला सक्षमीकरणात स्वयंसहाय्यता समुहाची भूमिका अतिशय महत्वपूर्ण आहे.

**संदर्भ :**

सकाळ ॲग्रोवन दैनिक दि.रविवार ११ ऑक्टोंबर २०२०

मुलानी एम.यु.महिला स्वयंसहायता बचत गट–डायमंड पब्लिकेशन, पुणे

साद नियतकालिक – प्रकाशक :– महाराष्ट्र राज्य महिला आयोग, जानेवारी २०१८

महिला आर्थिक विकास महामंडळ लिमिटेड, महाराष्ट्र शासन स्वयंसहाय्यता बचत गट, प्रशिक्षण कृती आराखडा, कला मुद्रण मुंबई–२२

दैनिक सकाळ, नाशिक आवृत्ती, 'भारतीय बचत गटाच्या प्रगतीला सलाम' १८ नोव्हेबर २००७

http://www.indiamicrofinance.com/wp.content

http://mr.m.wikipedia.org

http://www.unionbankofindia.co.in/.RABD.other.selfhelpGroup.aspx

mr.vikaspedia.in

OPEN ACCESS
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

**सारणी क्र. ३ : महिला स्वयंसहाय्यता गट बँक जोडणी स्थिती**
**(मार्च २००९ अखेर)**

(रक्कम कोटी रुपये)

| तपशिल | एकूण स्वयंसहाय्यता गट | | महिला स्वयंसहाय्यता गट | | एकूणात महिला प्रमाण |
|---|---|---|---|---|---|
| | संख्या | रक्कम | संख्या | रक्कम | |
| बचतीच्या माध्यमातून स्वयंसहाय्यता गट बँक जोडणी | ६१२११४८ | ५५४५.६२ | ४८६३९२१ | ४४३४.०३ | ७९.५ |
| कर्जाच्या माध्यमातून स्वयंसहाय्यता गट बँक जोडणी | ४२२४३३८ | २२६७९.८४ | ३२७७३५५ | १८५८३.५४ | ७७.६ |